# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

## प्रेसनोट

२०२१

गुन्हे शाखा, नवीमुंबई दिनांक १०.०६.२०२१

**रबाळे पोलीस ठाणे हद्दीमध्ये गांजा विक्री करणाऱ्या इसमाच्या गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने मुसक्या आवळल्या.**

........................................................................................................................

दि. २५/०५/२०२१ रोजी पोहवा/८४९ मोहंमद इकबाल बशीर शेख यांना त्यांचे गुप्तबातमीदारांकडून मिळालेल्या बातमीची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जयराज छापरीया यांना दिली असता त्यांनी तात्काळ मा. अपर पोलीस आयुक्त सो. गुन्हे, नवी मुंबई, मा. पोलीस उप आयुक्त सो. गुन्हे शाखा व सहा. पोलीस आयुक्त सो. गुन्हे शाखा यांना सांगितली असता, त्यांनी सदरची बाब गंभीर पणे घेवुन मार्गदर्शनपर सुचना देवुन वपोनि जयराज छापरीया यांना कारवाई करण्यास सांगितले त्या नुसार वपोनि जयराज छापरीया, सपोनि अश्विनी कुसुरकर, सहा. पोलीस उपनिरीक्षक इनामदार, पोहवा/८४९ शेख, पोना/२८७९ अहीरे असे मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी रबाळे पोलीस ठाणे हद्दीतील नवी मुंबई महानगरपालीका शाळा नंबर ४४ समोर, नारायण आदीत्वर पाटील निवास बिल्डींग, गाळानंबर ९, तळवली गाव, रबाले, नवी मुंबई येथे सदर गाळ्यात व रूम नंबर ३, सिताराम म्हात्रे यांची चाळ, तळवली, घनसोली गाव, रबाले, नवी मुंबई येथे सापळा लावून छापा टाकला असता सदर दोन्ही ठिकाणी **एकूण १०,३५,१५ रू किमतीचा पान मसाला व सुगंधित तंबाखू व गुटखा असा प्रतिबंधित मुद्देमाल** मिळून आला सदर गुन्हयात इसम नामे नितेश विनोद गुप्ता वय २९, धंदा-पान मसाला विक्री रा. एस एस २, रूम नंबर ७५०, सेक्टर १, कोपरखैरणे, नवी मुंबई यास अटक करून रबाले पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मा. पोलीस आयुक्त सो. नवी मुंबई, मा. अपर पोलीस आयुक्त सो. गुन्हे, नवी मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ व गुटखा विक्री विरोधात विशेष अभियान राबविण्यात येत आहे.

..............................................................................